॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

ज्ञान हेच खरे संपत्तीचा खजिना आहे.





■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १७ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


SPOT NEWS

## साडेचार महिन्यांत ७५ वाघांचा मृत्यू

● **चंद्रपूर** – वाघांच्या संरक्षणासाठी उपाययोजना राबविल्या जात असताना अवघ्या साडेचार महिन्यांत ७५ व्याघ्रमृत्यूची नोंद झाली आहे. यातही १२ एप्रिल ते १३ मेदरम्यान १६ वाघ देशाने गमावले. यातील आठ घटना मध्य प्रदेशात तर पाच महाराष्ट्रात घडल्या आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात जानेवारी ते १३ मे या चार महिन्यांत वन्यजीवांच्या झुंजीत, अपघातात, शिकार वा नैसर्गिकरित्या अशा विविध कारणांनी पंचाहत्तर वाघांचे मृत्यू झाले. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात सर्वाधिक २३ मृत्यूची नोंद झाली. चालू वर्षात देशात झालेल्या व्याघ्रमृत्यूंपैकी महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन राज्यांत मिळून आतापर्यंत ६१ टक्के मृत्यू झाले आहेत. वाघांच्या वाढत्या मृत्यूने वन्यजीवप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. मुळात प्रोजेक्ट टायगरच्या माध्यमातून मागील पाच दशकांत देशात वाघांच्या संख्येत वाढ झाली. ही बाब समाधानकारक मानली जात असताना शिकारीच्या घटनांमध्ये वाढ झाली. बहेलिया आणि बावरिया टोळ्यांकडून मागील पाच वर्षांत देशभरात शंभरहून अधिक वाघांच्या शिकारीच्या घटना घडवून आणण्यात आल्याचे समोर आले होते. जानेवारीमध्ये राजुऱ्यात बहुचर्चित बहेलिया टोळीला अटक करण्यात आल्यानंतर शिकारीच्या अनुषंगाने अनेक तथ्य समोर आले. वाघांच्या अवयव तस्करीचे आंतरराष्ट्रीय नेटवर्कही स्पष्ट झाले होते. यातच रेल्वे अपघातही वाढल्याने सुरक्षित उपाय योजण्याची गरज व्यक्त होऊ लागली आहे.

## पुण्यात पुन्हा कोयता गँगचा थरार

● **मुंबई** – पुणे शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेली गुन्हेगारी ही पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. मागील काही वर्षांपासून शहरात गुन्ह्यांचं प्रमाण झपाट्याने वाढलं असून, भरदिवसा रस्त्यावर होणारे हल्ले, खून आणि दहशतीच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाही आहे. अशातच आता दत्तवाडी परिसरात कोयता गँगने एका तरुणावर भररस्त्यात हल्ला केल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पुण्यात सुरू असलेल्या या कोयता गँगच्या दहशतीला लगाम घालण्यासाठी पोलिस यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

# भारत पाकिस्तानची पोल खोलणार

### सर्वपक्षीय खासदार पाकचा खरा चेहरा उघड करणार । प्रतिनिधीमंडळ लवकरच विदेश दौऱ्यावर जाणार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताकडून ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. यानंतर पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगापुढे आणण्यासाठी भारताचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये ठार झालेल्या दहशतवाद्यांच्या अंत्यविधीला पाकिस्तानी लष्कराचे आणि गुप्तहेर संघटना आयएसआयचे अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे पाकिस्तान अडचणीत आला. आता पाकिस्तानने एअर स्ट्राईकमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नुकसान भरपाई जाहीर केली. या सगळ्यावरून पाकिस्तानची दहशतवादपूरक भूमिका जगासमोर ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात तयारी सुरु केली.

काँग्रेस पक्षाच्या भूमिकेपेक्षा वेगळी भूमिका घेणारे खासदार शशी थरुर यांना केंद्र सरकारकडून महत्त्वाची भूमिका दिली जाण्याची शक्यता आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर थरुर यांनी घेतलेली भूमिका पक्षापेक्षा वेगळी आहे. त्याच थरुर यांना केंद्र सरकार महत्त्वाची जबाबदारी देण्याच्या तयारीत आहे. थरुर यांच्यासोबतच ठाकरेसेनेच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळेंनाकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार परराष्ट्र धोरणांच्या संसदीय समितीचे प्रमुख असलेल्या शशी थरुर यांच्याकडे बहुपक्षीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व सोपविले जाऊ शकते. त्यासाठी सरकारने थरुर यांच्याशी संपर्क साधला आहे. या संदर्भात थरुर सकारात्मक आहेत. परराष्ट्र धोरणांच्या स्थायी समितीचे ते अध्यक्ष आहेत. यासंदर्भात आपण काँग्रेस पक्षाचा सल्ला घेऊ, असे थरूर यांनी कळविले आहे.



### २२ मेपासून विदेश दौरा?

■ खासदारांचे पथक २२ मेच्या आसपास विदेशात रवाना होऊ शकते. ३ ते ४ जूनपर्यंत पथक मायदेशी परतेल. पथकात विविध पक्षांचे खासदार असतील. काँग्रेसचे मनिष तिवारी, अमर सिंह, शिवसेना ठाकरे गटाच्या प्रियंका चतुर्वेदी, भाजपचे समिक भट्टाचार्य, बीजेडीचे सस्मित पात्रा, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह अन्य काही खासदारांचा पथकात समावेश असेल.

### लवकरच प्रतिनिधी मंडळ तयार करणार

■ मोदी सरकार अनेक प्रतिनिधी मंडळं तयार करण्याच्या तयारीत आहे. खासदारांची ही पथके परदेश दौरे करतील आणि दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानची पोलखोल करतील. एका पथकात ५ ते सहा खासदार असण्याची शक्यता आहे. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्रालयाचा एक प्रतिनिधी आणि एक सरकारी अधिकारीही असेल. परदेशात जाण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि पासपोर्ट तयार ठेवण्याच्या सूचना सरकारने केल्या आहेत.

## डोंगरगाव आणि परिसरात प्रचंड पावसाने मोठे नुकसान





● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील आढळा विभागातील डोंगरगाव व परिसरात काल दुपारी दोन ते तीन वाजेच्या सुमारास डोंगरगाव येथे पावसाने मोठे नुकसान झाले आहे. शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साठले असून शेतात कांद्याचेही प्रचंड नुकसान झाले आहे. डोंगरगाव चिकणी, नळवाडी परिसरात मोठे पावसाने नुकसान झाले आहे.

काल दुपारी डोंगरगाव व परिसरात वादळ वाऱ्या सह पावसाने कांदा, डाळिंब, आंबे यांचे फार मोठे नुकसान झाले. तसेच डोंगरगाव ते चिकणी रस्त्यावर असलेले झाडे वाऱ्याने पडल्याने रस्ता पूर्ण बंद झाला होता. त्यातच भर म्हणून की, काय कृषी सहाय्यक देखील संपावर असून काम बंद आंदोलन सुरू असल्याने पंचनामे देखील वेळेत होतात की, नाही हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

काही ठिकाणी घरांची देखील नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांवर, गायीच्या गोठ्यावर झाडे पडल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.

यासर्व गोष्टींची प्रशासनाने दखल घेऊन आढळा विभागात तातडीने पंचनामे करून या भागातील शेतकऱ्यांना दिलासा दयावा, अशी मागणी होत आहे.

## अकोलेत दारुबंदी समितीची स्थापना

● **अकोले । वीरभूमी–**

अकोल्याचे तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली आज शासकीय दारूबंदी समितीची स्थापना करण्यात आली. या समितीत गटविकास अधिकारी, अकोले व राजूर येथील पोलिस निरीक्षक उत्पादन शुल्क अधिकारी आणि अशासकीय सदस्य यांचा समावेश आहे.



तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनी आज या समितीची स्थापना करून पहिली बैठक बोलावली. या समितीत अशासकीय सदस्य म्हणून हेरंब कुलकर्णी यांना घेण्यात आले आहे.

तहसीलदार यांनी सुरुवातीला पोलिस व उत्पादनशुल्क विभागाच्या कारवायांची माहिती घेतली.त्यात पुन्हा पुन्हा गुन्हे दाखल झालेल्या विक्रेत्यांवर आणखी कठोर कारवाई होण्यासाठी काय करता येईल यावरही सर्व अधिकाऱ्यांनी चर्चा केली. अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी यांनी ज्या दुकानातून ही दारू आणली जाते, ती माहिती घेऊन त्या लायसन दुकानावर कारवाई करण्याची गरज आहे व धाड पडण्यापूर्वी विक्रेत्यांना माहिती मिळते. याबाबत स्पष्टीकरण अधिकाऱ्यांना मागितले.

तहसीलदार यांनी प्रत्येक गावात ग्रामसुरक्षा दल स्थापन करण्यासाठी पंचायत समितीने पुढाकार घ्यावा, असे सांगून पुढील एका महिन्यात तालुक्यातील सर्व प्रमुख गावात ग्रामरक्षक दल स्थापन होतील असा ठराव या समितीने मंजूर केला.

यापुढे दर महिन्याला समितीची बैठक घेण्यात येईल व दारुबंदी बाबत आढावा घेतला जाईल.

यावेळी गटविकास अधिकारी अमर काळे, अकोले पोलिस निरीक्षक बोरसे, राजूर पोलिस निरीक्षक सरोदे, उत्पादन शुल्क अधिकारी सहस्त्रबुद्धे, अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी व भरारी पथक सदस्य उपस्थित होते.

# प्राथमिक शिक्षक बँकेच्या पारनेर शाखेला तळ्याचे स्वरुप

### पारनेरमध्ये जोरदार अवकाळी पावसाने प्राथमिक शिक्षक बँकेच्या शाखेत शिरले पाणी

■ **लतिफ राजे**


● **पारनेर । वीरभूमी –**

शुक्रवारी दुपारी ३ वाजेनंतर पारनेर शहरासह तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने तालुक्यातील शेतकरी, वीटभट्टी मालक तसेच इतरांची त्रेधा तिरपीट उडवून दिली. दुपारी झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने पारनेर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या पारनेर शाखेत पावसाचे पाणी शिरल्याने त्या ठिकाणी तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.


मागील तीन–चार दिवसांपासून पारनेर शहरासह तालुक्यामध्ये आभाळ सदृश्य स्थिती निर्माण होत होती. मात्र आज दुपारी तीन वाजेनंतर विजांच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पावसाचे आगमन झाले. या अवकाळी पावसाबरोबरच मोठ्या प्रमाणात विजांचा लखलखाट व गडगडाट होत होता. पारनेर शहरासह आसपास विजांच्या पडण्याचा अंदाज येत होता. जवळपास दोन तास चाललेल्या पावसाने अनेक ठिकाणी तळ्याचे स्वरूप आल्याचे पहाण्यास मिळाले. यावेळी पारनेर शहरातील दादासाहेब दोंदे स्मारकात असलेल्या प्राथमिक शिक्षक बँकेच्या शाखेमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने अक्षरशा बँकेला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.


अचानक बँकेमध्ये पाणी शिरल्याने शाखाधिकारीसह कर्मचारी वर्गाची त्रेधा तिरपीठ उडाली. बँकेच्या शाखाधिकारी, कॅशियर, क्लार्क या सर्वच जणांच्या विभागात अक्षरशः गुडघा भर पाणी साचले होते. यावेळी कर्मचारी वर्गाला काही समजण्याच्या आतच सर्वत्र चिखल युक्त पाणी आत आल्याने कपाट व टेबल यांच्या खालील कप्प्यातील रजिस्टर व इतर कागदपत्रे भिजू नये म्हणून ती काढताना कर्मचारी वर्गाची दमछाक झाली.

आज झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने शिक्षक बँकेत पाणी शिरले. मात्र ही परिस्थिती का निर्माण झाली याचाही विचार होणे गरजेचे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या आजूबाजूला असलेल्या रस्त्यांचे काम झाल्याने रस्त्यांची उंची वाढलेली आहे. पारनेर बाजारपेठेतील, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातील व एसटी स्टँडच्या डेपोपासूनचे पावसाचे पाणी अतिशय









वेगाने याठिकाणी गोळा होत असते. येथे गोळा झालेल्या पावसाच्या पाण्याचे निचरा होणे किंवा वाहून जाणे हे होत नसल्याने रस्त्यावर सर्वत्र पाण्याचे तळे साठलेले दिसत होते. त्यामुळे जोरदार पाऊस झाले तर शिक्षक बँकेप्रमाणेच रस्त्याच्या कडेला असलेल्या गाळ्यांमध्ये व दुकानांमध्ये सुद्धा हे पाणी शिरू शकते. कारण या पाण्याला पाहून जाण्यासाठी कुठेही चेंबर किंवा लेंडी नाल्यामध्ये सोडण्याची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे येत्या पावसाळ्या पुर्वीच येथे गोळा होणाऱ्या पावसाच्या पाण्याची निचरा होण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

SPOT NEWS



## केडगाव सरोदे नगरमध्ये महापालिका कर्मचाऱ्यांचा गौरव

● **नगर । वीरभूमी–**

केडगाव सरोदे नगर येथील श्री दत्त मंदिराचा तिसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व सामाजिक जाणीवेने साजरा करण्यात आला. श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात नगर महानगरपालिकेतील विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांचा, स्मशानभूमीत सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पोलिस उपअधीक्षक अमोल भारती व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. या सत्कार समारंभामुळे उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून वाहत होता. कोरोना महामारीच्या काळात जीवाची पर्वा न करता, सुट्टी न घेता सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. स्वच्छतेपासून ते स्मशानभूमीतील अंतिम सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांनी समाजासाठी केलेले योगदान वाखाणण्याजोगे होते. या कर्मचाऱ्यांच्या सेवेला सलाम करीत श्री गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्टने त्यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाला रघुनाथ लोंढे, सोपान कारखिले, नामदेव चव्हाण, धनंजय जामगावकर, संस्थापक पोपटराव सरोदे, ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे, योगेश सरोदे, अभिनव लोंढे, आकाश जरे, मनोहर बगळे, हर्षद अंकुश, सागर कारळे, गोरख हुलगे, नवनाथ लोंढे, सचिन कोतकर, पांडुरंग कोतकर, न्यानेश्वर तोडमल, दत्ता भगत, रोहित गाडेकर, परमेश्वर आवटे, केदारे सर, बोरकर काका, प्रशांत गायकवाड, सचिन सरोदे, कृष्णकांत जरे, युवराज दळवी, आरती सरोदे, राणी सरोदे, मोनिका म्हस्के, संगीता जारे, स्वाती तांदळे, अनिता गीते आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किरण मेंगाळ यांना आयबीपीएस परीक्षेत यश

● **अकोले । वीरभूमी–**



शहरातील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी किरण काळू मेंगाळ यांनी नुकत्याच झालेल्या आयबीपीएस परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यांना विरार येथे एमएसईबी येथे कनिष्ठ लेखापाल म्हणून पोस्टिंग मिळाली आहे. किरण मेंगाळ यांच्या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी विश्वस्त तथा माजी आ. वैभवराव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, संस्थेचे सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, शिक्षणाधिकारी संपतराव मालुंजकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांसह संस्था पदाधिकारी, कर्मचारी यांसह सर्वच क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# काकडीत कोल्हे गटाला मोठा धक्का

### काकडीच्या सरपंच सौ.पूर्वा गुंजाळ व कानिफनाथ गुंजाळ काळे गटात

● **कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील काकडी गावच्या सरपंच सौ.पूर्वा गुंजाळ व कोल्हे गटाचे कट्टर कार्यकर्ते कानिफनाथ गुंजाळ यांनी नुकताच ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्त्यांसह काळे गटात प्रवेश केला आहे. आ.आशुतोष काळे यांनी सरपंच सरपंच सौ. पूर्वा गुंजाळ, कानिफनाथ गुंजाळ, त्यांच्या सहकारी सदस्यांचे व कार्यकर्त्यांचे काळे गटात स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



काकडी गावच्या सरपंचपदाची जबाबदारी सांभाळत असतांना काकडी गावचा अतिशय चांगल्या प्रकारे विकास केला असून हा विकास करतांना आ.आशुतोष काळे यांची मोठी मदत झाली आहे. काकडी गावची पाणी पुरवठा योजना, वेस काकडी रस्ता,शाळा खोल्या,वीज रोहित्र, तसेच विमानतळाच्या माध्यमातून गावच्या समस्या सोडविण्यात त्यांचे सहकार्य लाभले असून गावाच्या विकासासाठी आमदार निधीतून आवश्यक असलेला निधी आ.आशुतोष काळे यांनी देखील सढळ हाताने दिला आहे. पुढील विकासकामांसाठी विविध विकास कामांचे प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत असून लवकरच त्या विकास कामांना आ.आशुतोष काळे यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होणार आहे. यापुढील काळातही काकडी गावाचा जास्तीत जास्त विकास व्हावा यासाठी सरपंच सौ.पूर्वा गुंजाळ व कोल्हे गटाचे कट्टर कार्यकर्ते कानिफनाथ गुंजाळ यांनी ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असल्याचे यावेळी सांगितले.

यावेळी सरपंच सौ.पूर्वा गुंजाळ, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब मोरे, अशोक सोनवणे, चंद्रकलाताई सोनवणे, साखरताई सोनवणे, गजानन सोनवणे, रविंद्र गुंजाळ व कानिफनाथ सोनवणे आदींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी प्रभाकर गुंजाळ नंदकिशोर ओताडे उपस्थित होते.

> आजवर सरपंचपदाच्या माध्यमातून काकडी गावाचा सर्वांगीण विकास एवढा एकच उद्देश डोळ्यासमोर ठेवून माझी वाटचाल सुरू होती. या वाटचालीत आ. आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून आजवर काकडी गावाचा विकास करण्यासाठी मोलाची मदत झाली आहे व यापुढील काळातही होणार आहे यात शंका नाही. मतदारांनी टाकलेला विश्वास सार्थ ठेवून याहीपेक्षा जास्त विकास करण्यासाठी मी काळे गटात प्रवेश केला आहे. मला विश्वास आहे की, विकासाच्या बाबतीत नेहमीच सजग असणाऱ्या व जनतेच्या प्रश्नाची सखोल जाणीव असणाऱ्या आ. आशुतोष काळे यांची साथ देवून काकडी गावाचा यापेक्षा अधिकचा विकास सहजपणे साधला जाणार आहे.
>
> – **सौ. पूर्वा गुंजाळ,** सरपंच, काकडी

## उद्या पाथर्डीत भव्य तिरंगा सन्मान पदयात्रा

● **पाथर्डी । वीरभूमी–**

ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी कारवाईच्या अनुषंगाने भारतीय लष्कराच्या समर्थनार्थ सर्व राष्ट्रप्रेमी नागरीकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने रविवार दि. १८ मे २०२५ रोजी पाथर्डी येथे भव्य तिरंगा सन्मान पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या तिरंगा पदयात्रेची सुरुवात सकाळी ८.०० वा. पाथर्डी शहरातील वीर सावरकर मैदान, बाजरतळ येथून होणार आहे.

पहलगाम येथील भारतीय पर्यटकांवर दहशतवादी हल्ला होवून त्यात २७ निष्पाप पर्यटक मारले गेले, या कृत्यामुळे संपूर्ण भारतात पाकिस्तान व आंतकवादी कृत्यांच्या विरोधात तीव्र संतापाची लाट होती. या कृत्याचा बदला म्हणून भारतीय नेतृत्व व लष्कराने ऑपरेशन सिंदूर यशस्वी राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळाचा नायनाट करुन, पाकिस्तानच्या संरक्षणदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी हल्ले करुन त्यांचे मोठे नुकसान केले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ संपूर्ण भारतभर भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.

या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, सामाजिक संस्था, समविचार संस्था, व महिला सहभागी होणार आहेत. या तिरंगा पदयात्रेच्या वेळी शहीद जवान स्मारक, किंवा हुतात्मा स्मारक यांना श्रध्दाजली अर्पण करुन, देश भक्तीच्या घोषणा, देश भक्तीपर गीते लावून, हम सेना के साथ है, ऑपरेश सिंदूर के साथ राष्ट्र, असे बॅनर लावून आपल्या वीर जवानांना अभिवादन करण्यात येणार आहे.

या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, नागरीक, युवक-युवती यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

## भागवत कथेच्या श्रवणाने मोक्ष प्राप्ती

### महंत रामगिरीजी महाराज । अंजनापूर येथील सप्ताहाची सांगता

● **कोपरगाव । वीरभूमी–**

कलियुगात मोक्ष प्राप्ती करण्याचा सोपा मार्ग भागवत कथा असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरीजी महाराज यांनी केले आहे.

तालुक्यातील अंजनापूर येथे गेल्या ७ दिवसापासून श्री संत जगद्गुरु जनार्दन स्वामी समाधीस्थान बेट कोपरगावचे मठाधीपती महंत रमेशगिरीजी महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने आयोजित श्रीमद् भागवत कथेची काल्याच्या किर्तनाने भाविक भक्तांच्या उपस्थित मोठ्या जल्लोषात सांगता झाली.



या प्रसंगी रामगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना उपदेश करताना सांगितले की, भक्ती हा परा कोटीचा मार्ग आहे. ईश्वरीय साधना मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखवते हे प्रत्येकाला समजत असूनही त्याची आवड निर्माण होत नाही त्यामुळे कलयुगात मनुष्याला दिवसेंदिवस समस्या वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने धार्मिक कार्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदवत परमात्म्याचे नामस्मरण करावे. परमात्मा सदैव आपल्याला येणाऱ्या समस्या अडचणी सोडवण्यासाठी तयार असतो. त्याकरता मनोभावे देवाची प्रार्थना करणे आवश्यक आहे . भागवत कथा श्रवण करणाऱ्या सेवकांचे शास्त्रीय नियमाचे विवेचन सांगत भागवताची निर्मिती कशी झाली तसेच या कलियुगात मोक्ष प्राप्ती करण्याचा सोपा मार्ग भागवत कथा असल्याचे सांगितले.

या भागवत कथेस गोदावरी दूध संघाचे चेअरमन राजेश परजणे, शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास कोते, भाजपा तालुकाध्यक्ष कैलास राहाणे, सिने अभिनेते हंसराज जगताप, शिर्डीचे माजी नगरसेवक तुषार गोंदकर, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब राहाणे आदींनी भेटी दिल्या तर अखेरच्या दिवशी मठाधिपती महंत रमेशगिरीजी महाराज, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन औताडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शिरिष व वमने, कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखान्याचे संचालक प्रवीण शिंदे, हभप. शिवशाहीर विजय तनपुरे, अभिनेते सचिन गवळी, हभप. मयूर महाराज पाचोरे, हभप चांगदेव महाराज ढेपे, हभप बबन महाराज गाडेकर, हभप भास्कर महाराज गव्हाणे आदी संत महंतासह परिसरातील अनेक सरपंच, उपसरपंच, विविध संस्थेचे पदाधिकारी, महिला, पुरुष, युवक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून ध्येय निश्चित करावे : अभय आव्हाड

● **पाथर्डी । वीरभूमी –**

प्रत्येक विद्यार्थ्यांचे शालेय जीवन अतिशय महत्त्वाचे मानले जाते. या शालेय जीवनातील इयत्ता दहावी नंतरचा टप्पा अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले जीवन आदर्शमय बनवावे तसेच पालकांनी आपल्या पाल्यांकडे सातत्याने लक्ष ठेवावे. शालेय जीवनात प्रत्येक विद्यार्थ्यांनी ध्येयवादी व प्रयत्नवादी राहून आई- वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी व पुढील ध्येय साध्य करावे असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.




शहरातील श्री विवेकानंद विद्यामंदिर या शाळेतील इयत्ता १० वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ नुकताच मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड अध्यक्षस्थानी होते.

विद्यालयातील सुमित अशोक काळे या विद्यार्थ्याने ९७.६० गुण प्राप्त करून पाथर्डी शहरात व विद्यालयात प्रथम येण्याचा मान प्राप्त केला,तर ईश्वर आदिनाथ फुंदे ९६.२० गुण द्वितीय तर कु. सानवी रवींद्र कासार ९४.८० गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक पटकाविला. विद्यालयातील २३२ विद्यार्थ्यांपैकी २३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ९९.१३ टक्के लागला आहे. १८ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले. यावेळी ८५ किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह, फेटा बांधून व पेढा भरुन गौरव करण्यात आला.यावेळी इयत्ता दहावी सर्व विषय शिक्षकांचा संस्थेच्या व पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, महेंद्र तांदळे, नंदकुमार झेंड व सर्व पालक बंधू भगिनी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके, सूत्रसंचालन रेश्मा सातपुते तर आभार अर्चना दराडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अभिजीत सरोदे, सतीश डोळे, संदीप धायतडक, स्नेहल बोराडे, विठ्ठल धस, तुषार शिंदे, राधा आव्हाड, प्रमोद हंडाळ, शशांक महाजन, दीपक राठोड, सतीश बोरूडे, बाळू हंडाळ, आजिनाथ शिरसाट, कैलास भोसले यांनी परिश्रम घेतले.


## लकी ड्रॉच्या नावाखाली खेड्यापाड्यात फसवणुकीचा डाव

### श्रीगोंदा तालुक्यात अनेकजणांची फसवणूक । पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

लकी ड्रॉ व वेगवेगळ्या एंटरप्रायझेसच्या नावाखाली श्रीगोंदा तालुक्यातील खेड्यापाड्यातील भोळ्या-भाबड्या लोकांची फसवणूक करणाऱ्या लुटारू टोळ्यांनी सध्या धुमाकूळ घातला आहे. ट्रॅक्टर, चार चाकी, दुचाकी, शेती उपयोगी आधुनिक अवजारे, घरगुती इलेक्ट्रॉनिक वस्तूंसारख्या मोठ्या बक्षिसांचे आमिष दाखवून गृहपयोगी वस्तू विक्री केंद्राच्या सबबीखाली हजार, दोन हजार रुपयांची कुपन विक्री करुन त्याचा लकी ड्रॉ आयोजित केला जातो. या लकी ड्रॉमध्ये आयोजक वेळवेगळ्या क्लृप्त्या वापरून ग्राहक सभासदांची घोर फसवणूक करून कोट्यावधी रुपयांची माया जमा करत आहेत. श्रीगोंदा शहरात दि.१३ मे रोजी एका नामांकित मंगल कार्यालयात असाच एक सोहळा रंगला परंतू हजारो कुपन धारकांना काहीही न मिळता खाली हात परतावे लागले व आयोजकांनी कार्यक्रम संपताच गाशा गुंडाळला.




याबाबत अधिक माहिती अशी की नगर - पुण्यासारख्या शहरातील मास्टर माईंड, आर्थिक गुन्हेगार ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना पैशाचे आमिष दाखवून आपल्या टोळीत सामील करून घेतात. त्यांना कमिशनवर गृहपयोगी वस्तू विक्री व लकी ड्रॉ योजनेच्या कामाला जुंपवून गावोगावी कुपन विक्री करण्याचे टार्गेट देतात. या टोळ्या ठराविक रकमेची कूपन विक्री करतात. प्रत्येक कुपनसोबत कुपनाच्या किमतीपेक्षा कमी किमतीची दर्जाहीन वस्तू नंतर मिळणार असे आश्वासन देतात, वरती शिल्लक राहिलेला नफा गरीब, अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी उपयोगात आणण्याचा भावनिक साद घालतात. ज्यामुळे लोक या मायाजालात अडकतात. या टोळ्या गावोगावी भव्य बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करतात आणि तिथे सर्वांसमोर सोडत काढली जाते. मात्र, यातच मोठा गेम आहे. मोठ्या बक्षिसांची सोडत जाहीर करताना आधीच मार्किंग केलेली कुपने बोगस नावांवर जाहीर केली जातात. यामुळे सामान्य लोकांच्या डोळ्यात धूळफेक करून त्यांची लूट केली जाते. अशा प्रकारच्या फसवणुकीच्या अनेक तक्रारी ग्रामीण भागातून समोर येत आहेत. फसवणूक झालेल्या व्यक्तींनी सांगितले की आम्ही तालुक्यातील शेकडो जणांनी १५०० रुपयांचे तिकीट घेतले, त्याबदल्यात आम्हाला २०० रुपयांची निकृष्ट दर्जाची वस्तूही मिळाली नाही. बक्षीस समारंभात मोठी बक्षीसे जाहीर झाली, पण ती कुणालाच मिळाली नाहीत.

अशा घटनांमुळे ग्रामीण जनता हवालदिल झाली आहे. या लुटारू टोळ्या स्थानिक बड्या धेंडांना हाताशी धरुन संरक्षण मिळवतात. नागरिकांनी या फसवणुकी विरोधात आवाज उठवला तरी भीतीपोटी कुणीही अधिकृत तक्रार करत नाही. पोलिसांनी या प्रकरणांचा सखोल तपास करावा, अशी मागणी होत आहे. जर पोलिसांनी या टोळ्यांचा पाठलाग केला तर यामागील मोठे मासे गळाला लागू शकतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाची कठोर कायदेशीर कारवाई आणि जनजागृतीची गरज आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । सन २०२५-२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठक



**● अहिल्यानगर । वीरभूमी–** शेती अधिक शास्त्रशुद्ध, फायदेशीर व पर्यावरणपूरक बनावी यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शेतीसाठी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन २०२५ –२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार अमोल खतले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सातत्याने मार्गदर्शन दिले जात आहे. हवामानातील बदल, जमिनीची गुणवत्ता, योग्य पीक निवड, सिंचन पद्धती, खतांचे प्रमाण या बाबींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी यासाठी योजनांची पुस्तिका प्रकाशित करावी. योजनांची माहिती समाजमाध्यमांद्वारेही द्यावी.

तालुकास्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामपूर्व बैठकांचे आयोजन करून या बैठकीत तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान करावा. या बैठकीस शेतकऱ्यांना आमंत्रित करावे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधावा, अशा सूचनाही पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील लाभाची व्याप्ती वाढवावी. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीक पद्धतीत बदल करून अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांकडे वळावे यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. प्रधानमंत्री पीक विम्याच्या नवीन लाभ प्रक्रियेविषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती करावी. शेतकऱ्यांचे प्रश्नसोडविण्यासाठी ऑनलाईन तक्रार निवारण यंत्रणा उभारावी, विनाशुल्क हेल्पलाईन सुरू करावी. कालबाह्य योजनांचा आढावा घेऊन कृषी आयुक्तांना अहवाल सादर करावा.

गोगलगाय, रानडुकर व बिबट्या यासारख्या प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाच्या मदतीने तात्काळ उपाययोजना कराव्यात. ठिबक सिंचन अनुदान वेळेत वितरित होईल याची दक्षता घ्यावी. सर्व तालुक्यांतील कृषी केंद्रांची भरारी पथकाद्वारे अचानक तपासणी करावी. शेतकऱ्यांनी युरिया खताची मागणी केल्यास त्यांना पर्यायी खत दिले जाऊ नये, याबाबत कृषी केंद्र चालकांना स्पष्ट सूचना द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना निर्भेळ, दर्जेदार व पुरेशा प्रमाणात खते व बी–बियाणे मिळतील याची काळजी घ्यावी. अकोले तालुक्यात भाताचे बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे. प्रत्येक कृषी केंद्राबाहेर बियाणे व खते यांचा पुरवठा व शिल्लक साठा दर्शवणारा फलक लावावा. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कारवाई करावी.

शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीत झालेल्या बदलांचे सांख्यिकीय परीक्षण करावे. पीक विमा पद्धतीतील बदलांची सर्वदूर माहिती व्हावी यासाठी व्यापक जनजागृती करावी. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शेतीत होत असलेल्या नवनवीन प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांना मिळावी यासाठी कृषी पर्यटन योजना सुरू करण्यासाठी कृषीमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. शेती उत्पादनाबरोबरच माल निर्यातीमध्ये जिल्हा अग्रेसर राहावा यासाठी पायाभूत सुविधा निर्माणावर भर द्यावा, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी मिळणाऱ्या विविध अनुदानातून बचत करून शेतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर चालणारे ड्रोन खरेदी करावेत व त्याचा उपयोग उत्पादनवाढीसाठी करावा. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. खरीप हंगाम उत्साहवर्धक व चांगले उत्पन्न देणारा ठरेल. शेतकऱ्यांच्या जीवनात सुख व समृद्धी यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत कृषी विभागाने सुरू केलेला 'शेतकरी डॉक्टर' उपक्रम तसेच 'शेतीचा सखा' चॅटबोट उपक्रम शेतकऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेस पात्र शेतकऱ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. बोराळे यांनी खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेले नियोजन व विविध योजनांची अंमलबजावणी याचे सादरीकरण केले. यावेळी कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी उपस्थित होते. या शेतकऱ्यांशीही पालकमंत्र्यांनी थेट संवाद साधला.

बैठकीपूर्वी, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, मळणीयंत्र व कंबाईन हार्वेस्टरचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मंजुरीपत्राचे वितरणही करण्यात आले.

## महात्मा विद्यार्थी वसतिगृहामध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** शहराच्या माळीवाडा येथील महात्मा विद्यार्थी वसतिगृह, महात्मा फुले छत्रालयात सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ५ वी ते १० वी मधील मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती–जमातीच्या तसेच अनाथ, निराधार, उपेक्षित व शिकण्याची इच्छा असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भोजन, निवासाबरोबरच शालेय साहित्य, अभ्यासिका, वाचनालय, वर्तमानपत्रे, वैयक्तीक मार्गदर्शन आदी सुविधा वसतीगृहामार्फत उपलब्ध आहे. आर्थिक दुर्बल व होतकरू गरजू विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह महात्मा विद्यार्थी वस्तीगृह, माळीवाडा वेशीजवळ वस्तीगृहाच्या कार्यालया संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२७०४८११९८ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

## धनादेश न वटल्याने आरोपीस ६ महिने कारावास ९ टक्के दराने व्याजासह रक्कम देण्याची शिक्षा

### श्रीरेणुकामाता मल्टिस्टेटला दिलासा । जिल्हा कोर्टाचा आदेश



**● अहिल्यानगर । वीरभूमी–** श्रीरेणुकामाता मल्टीस्टेट को–ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांना त्यांच्या थकित कर्ज रकमेपोटी दिलेल्या ३२ हजार ७१ रुपयाचा धनादेश वटला नाही, म्हणून श्री रेणुका माता मल्टीस्टेट संस्थेने जिल्हा न्यायालयात राम दगडू भोसले (रा. प्लॉट नं. ३२, राम निवास, पद्मानगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर) याचे विरुद्ध दाखल केलेल्या तक्रारी वर न्यायाधीश क्र. २० अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. बी. दिवाकर यांनी आरोपीस दोषी धरून त्यास सहा महिने कारावासाची व रक्कम ३२ हजार ७१ रुपये नऊ टक्के व्याजदराने धनादेश अनादर झालेल्या तारखेपासून आजतागायत द्यावे अशी शिक्षा सुनावली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, राम दगडू भोसले याने श्रीरेणुकामाता मल्टीस्टेट को–ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या भिस्तबाग (अहमदनगर) शाखेकडून ३० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. सदर कर्ज थकित झाले. सदर कर्जाच्या परतफेडीपोटी आरोपीने सावेडी शाखेचा येस बँकेचा ३२ हजार ७१ रुपयाचा धनादेश फिर्यादी संस्थेच्या नावे दिला होता. सदर धनादेश न वटल्यामुळे फिर्यादी श्री. रेणुकामाता मल्टीस्टेट को–ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेड, अहमदनगर यांनी अहमदनगर येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या कोर्टात आरोपी विरुद्ध दावा दाखल केला होता.

सदरच्या केसचे कामकाज न्यायाधिश श्री. व्ही. बी. दिवाकर यांच्यासमोर चालले. या केसमध्ये फिर्यादीतर्फे संस्थेचे धीरज आव्हाड यांची साक्ष ग्राह्य मानून मे. कोर्टाने आरोपीस सहा महिने कारावासाची व रक्कम ३२ हजार ७१ रुपये धनादेशाचा अनादर झालेल्या तारखेपासून आज अखेर ९ टक्के दराने व्याजासह द्यावेत, अशी शिक्षा ठोठावली आहे.

फिर्यादीतर्फे ॲड. तेजस उदास यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. धनलक्ष्मी नायडू यांनी सहकार्य केले.

## संजीवनी सैनिकी स्कूलने १०० टक्के निकालाची परंपरा राखली; विद्यालयात विक्रम जगताप प्रथम



**● कोपरगाव । वीरभूमी–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेतलेल्या इ.१० वीच्या परीक्षांचे निकाल जाहिर केले असुन यांत संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी सैनिकी स्कूलने आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यात विक्रम सुरेश जगताप याने ९५. ६० टक्के गुण मिळवुन स्कूलमध्ये सर्व प्रथम क्रमांकाने उत्तिर्ण होण्याचा बहुमान पटकाविला. निखिल वाल्मिक गायकवाडने ९४.८० टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. सोहम सुदिप देशमुखने ९३.४० टक्के गुण मिळवुन तिसऱ्या क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. हितेश दादाजी पाटील व गणेश शरद कांगणे यांनी अनुक्रमे ९३.२० व ९२.८० टक्के गुण मिळवुन चौथा व पाचवा क्रमांक मिळविला. एकुण ५२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ४४ विद्यार्थ्यांनी ८० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळवुन आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडविले.

हितेश पाटीलने गणित विषयात १०० पैकी १०० व सायन्स विषयात १०० पैकी ९८ गुण मिळविले. विक्रम जगताप ने हिंदी विषयात ९४ तर इंग्रजी विषयात ९२ गुण मिळवुन विक्रम नोंदविला. सोहम जगतापने समाजशास्त्र विषयात १०० पैकी ९७ गुण मिळविले तर सत्यम संदिप वाघने मराठी विषयात १०० पैकी ९१ गुण मिळविले.

संजीवनी सैनिकी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय ब्रास बॅन्ड स्पर्धा, विविध खेळ, सांस्कृतिक, विज्ञान प्रदर्शन , तांत्रिक स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, अशा प्रत्येक बाबतीत बक्षिसे मिळवुन आपली आघाडी सिध्द केली आहे. आता शैक्षणिक गुणवत्तेमध्ये १०० टक्के निकाल देवुन स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे, विश्वस्त श्री सुमित कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक, प्राचार्य कैलास दरेकर व सर्व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# मुतखेलच्या समीर इदे याने मिळवला दहावीत तिसरा क्रमांक

## कोपरापासून हात नाही तरीही दहावीच्या शालांत परीक्षेत मिळवले यश । समीरचे सर्वत्र होत आहे अभिनंदन

**● अकोले । वीरभूमी–** अकोले तालुक्यातील मुतखेल हे भंडारदरा धरणाच्या काठावर वसलेले गाव असून या गावातील समीर विठ्ठल ईदे हा जन्मतःच अपंग असुन याला कोपरापासुन दोन्हीही हात नाहीत. तरीसुद्धा समीर आपल्या जिद्दीच्या जोरावर दहावीच्या शालांत परीक्षेत विद्यालयामध्ये तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. समीर हा एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आलाय. वडील विठ्ठल हे थोड्याफार शेतीवरच आपला कुटुंबाचा गाडा चालवतात. या कुटुंबात जन्माला आलेल्या समीरचे पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुतखेल येथेच झाले. शिक्षण हे वाघिणीचे दूध असते याचे बाळकडू त्याला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतच मिळाले.

मुतखेल शाळेचे मुख्याध्यापक किसन दराने यांनी समीरला योग्य दिशा देत सातवीपर्यंत अगदी अभ्यासात हुशार केले . हाच तो समीर त्यानंतर आठवीला शासकीय आश्रमशाळा मुतखेल येथे जाऊ लागला. येथेही समीरने आपल्या शिक्षणात आपले अपंगत्व अडचण ठरणार नाही याची काळजी घेत जिद्दीने अभ्यास केला. समीरला शिक्षणासाठी कोणतीही अडचण येऊ नये याची काळजी घेतली त्याच्या वर्गशिक्षिका श्रीमती सुजाता झेंडे यांनी. समीर हा दहावीच्या परीक्षेमध्ये निश्चितच यश मिळू शकतो याचा सुजाता झेंडे व त्याच्या शिक्षकांना विश्वास होता. समीरला कोपरापासून खाली हात नाहीत. मात्र आपले हात आपली अडचण न ठरवता समीर त्या कोपराच्या सहाय्यानेच सुंदर अक्षर गिरवतो. त्याचे हस्ताक्षर सुंदर आहे. समीरने दहावीच्या परीक्षेत ७३.८० टक्के गुण मिळवून विद्यालयामध्ये तिसरा येण्याचा मान मिळविला आहे. समीरच्या या यशामध्ये विद्यालयाचे प्राचार्य बारामती, अधीक्षक जगदीश बेळगे, मुलींच्या अधीक्षिका सुरेखा रासने, वर्गशिक्षिका सुजाता झेंडे, बाबासाहेब लोंढे, जनार्धन मगर, रणजीत बागुल, शिंदे ताई यांच्यासह इतर शिक्षक व व शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे.




समीरचा शालांत परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असला तरी सुट्टीचा रिकामा कालावधी समीर हा रिकामा घालवताना दिसून येत नाही. त्याने सुट्टीच्या कालावधीमध्ये संगणकाचे धडे घेणे सुरू केले आहे. भविष्यात समीरला विज्ञान शाखेतून प्रवेश घ्यायचा असून त्याला ज्ञानदानाच्या भूमिकेत आपल्याला शिक्षणाचे धडे द्यायला आवडेल असे समीर अभिमानाने सांगतोय. आपल्या अपंगत्वाच्या जोरावर समीरने मिळविलेले हे यश निश्चितच अनमोल असून समीरला शिकण्याची भरपूर जिद्द आहे.

### ...तर सामान्य जीवन जगण्यास होईल मदत

■ समीर हा अतिशय गुणी आणि हुशार विद्यार्थी असून या विद्यार्थ्याच्या हातावर जर शस्त्रक्रिया झाली तर निश्चितच समीरला सामान्य जीवन जगण्यास मदत होणार आहे. यासाठी सेवाभावी संस्थांनी समीरच्या मदतीला पुढे येण्याची खरी गरज आहे.

## भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने महाकवी वामनदादा कर्डक यांना अभिवादन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** अहिल्यानगर भारतीय बौद्ध महासभा शाखेतर्फे महाकवी वामनदादा कर्डक यांचा २१ व्या स्मृतिदिना निमित्त सिद्धीबाग येथील बुद्ध विहार येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना वामनदादांच्या गीत संग्रहाचे संग्रह माधवरावजी गायकवाड समवेत भीम शाहीर दादू साळवे, बौद्धाचार्य दिपक पाटोळे, लक्ष्मण माघाडे, सुनीता गायकवाड, बौद्धाचार्य दिपक अमृत, गौतम पाचारणे, संदीप वाघमारे, संजय डहाणे, विजीतकुमार ठोंबे, बबन दिवे, गुलाबराव नेटके बाबा, बौद्धाचार्य प्रकाश कांबळे, मच्छिंद्र गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात त्रिसरण बुद्ध पूजा घेऊन करण्यात आली त्यानंतर शहराध्यक्ष दिपक पाटोळे म्हणाले की, वामनदादा कर्डक यांच्या कडे लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादा कडे लेखणी, वाणी व संगीत याचा त्रिवेणी संगम होता. तसेच वामनदादा ची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा होकार. वामनदादाच्या गीताचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे... तुझे गीत व्हावे मानवता आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीय व्यवस्था यावर वामनदादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ, यावरही भाष्य केले त्यांच्या गीताचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामनदादांनी स्वतःला भीम कार्यात वाहून घेतले दादांनी आपल्या असंख्य लोकगीतातून लोकांना भुरळ घातली म्हणूनच ते लोककवी झाले अशी भावना व्यक्त करत त्यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ खऱ्या अर्थाने गोरगरीब दिंनदलित समाजापर्यंत पोहण्याचा काम वामनदादांनी केलं. त्यांचे उपकार दलित समाज आंबेडकर समाज कधीही विसरू शकत नाही.